महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर-४४० ००१
दुरध्वनी क्र.इ.पी.बी.एक्स.७१२-२५६५४०३/२५६०२०९/२५५३४०१/२५५३३६०फॅक्स-२५६१७७५
www.nagpureduboard.in
msboardnagpur@gmail.com

पत्र क्र.ना.वि.मं/गो.सं.केंद्र/1697
नागपूर, दिनांक:07/08/2020

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभागीय मंडळ नागपूर

विषय:- फेब्रु/मार्च २०२१ माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेकरिता नवीन परीक्षा केंद्राकरिता प्रस्ताव पाठविणे बाबत.

संदर्भ :-राज्य मंडळ,पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-८/३८६५,दिनांक-२३.०७.२०१९

फेब्रु/मार्च २०२१ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी आपल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयास नवीन परीक्षा केंद्र मिळण्यासाठी मंडळाच्या विहीत नमुन्यात ऑनलाईन प्रस्ताव मंडळाच्या **https://forms.gle/N6kpFhMrLPFtXiWB8** या लिंकवर ऑनलाईन सादर करावा. ऑनलाईन नोंदणी सोबत नवीन परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाची **pdf** मधील **form** ची प्रिंट घेऊन हार्ड कॉपी तीन प्रतीत (मूळ प्रत व दोन छायांकित प्रत) विभागीय मंडळास दिनांक ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत पोहचेल अशा तऱ्हेने पाठवावी. केंद्र प्रस्तावा सोबत ना परतावा प्रक्रिया शुल्क रु.१०००/- (एक हजार फक्त) आणि छाननी शुल्क रु.१०,०००/-(दहा हजार फक्त) रोख /चलन / NEFT स्वरुपात कार्यालयात जमा करावी.

केंद्राचे प्रस्ताव सादर करतांना रु.१०,०००/-छाननी शुल्क व रु.१०००/- प्रक्रिया शुल्क याप्रमाणे एकूण रु. ११,०००/- (रुपये अकरा हजार फक्त) खालीलप्रमाणे भरणा करता येतील.

१. कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०४.०० या काळात (दुपारी ०१.३० ते ०२.०० सोडून) नागपूर विभागीय मंडळातील रोख शाखेत रोखीने पैसे स्विकारले जातील.रु.११,०००/-भरल्याची रोख पावती घेऊन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक राहील.

२. विभागीय सचिव,नागपूर विभागीय मंडळ,नागपूर यांचे नावे बॅक ऑफ इंडिया शाखेत चलनव्दारे रु.११,०००/- भरून नवीन केंद्र प्रस्तावासोबत मूळ चलन सादर करावे.

३. उच्च माध्यमिक परीक्षेकरीता (HSC) नवीन परीक्षा केंद्राच्या प्रस्तावासोबत रु.११,०००/-मंडळाचे खाते क्र. **870610210000020** आयएफएससी कोड **BKID0008706** तथा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) करिता खाते क्रमांक **870610210000019** आयएफएससी कोड **BKID0008706** या खात्यावर **NEFT/RTGS** व्दारे आपले शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या खात्यातून रक्कम वर्ग करुन व तशी पूर्णत: खात्री करुन रककम वर्ग केल्याची मूळ पावती प्रस्तावासोबत सादर करावी.

नवीन परीक्षा केंद्र मिळणेबाबत अर्जाचा नमूना व नवीन परीक्षा केंद्राचे निकष या मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रस्तावासोबत प्रपत्रात नमूद सर्व कागदपत्रे जोडावी. अपूर्ण प्रस्ताव राहणार नाही याची खबरदारी घ्यावी, विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावे. विलंबाने प्राप्त होणारे प्रस्ताव स्विकारले जाणार नाही व त्याची जबाबदारी आपली स्वत:ची राहील याची नोंद घ्यावी.

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

C:\Users\MK\Desktop\DINESH \dinesh २.docx"

## माध्यमिक शालांत (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेसाठी नवीन परीक्षा केंद्र सुरू करण्यासाठीचा अर्जाचा नमुना(किंमत रू.1000 / –)

| अ. क्र. | केंद्रासाठी निश्चित केलेल्या अटी | शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने भरावयाची माहिती | तपासणी समितीचा अहवाल |
|---|---|---|---|
| 1 | नवीन नियोजित परीक्षा केंद्राच्या माध्यमिक शाळेचे / कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, संपूर्ण पत्ता,पिनकोड,दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकासह | | |
| 2 | सध्या मुख्याध्यापक / प्राचार्य म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीचे संपूर्ण नाव,शैक्षणिक अर्हता, मंडळाच्या परीक्षा संचालनाच्या कामाचा अनुभव व भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| 3 | नियोजित केंद्र माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,ज्या इमारतीत आहे,ती जागा संस्थेच्या मालकीची आहे का? असल्यास त्या संदर्भातील कागदपत्र व भाडेतत्वावर असल्यास भाडे पावतीची व करारनाम्याची सत्यप्रत जोडावी व इमारत बांधकामाचे वर्ष,जागेचे क्षेत्रफळ नमूद करावे | | |
| 4 | नियोजित केंद्रशाळेच्या ठिकाणी असलेल्या स्थानिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची नावे व त्यामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या<br>अ)एकूण शाळेची संख्या<br>ब) विद्यार्थी संख्या | | |
| 5 | नियोजित केंद्रास ज्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय संलग्न होणार आहे त्याचे नांवे संपूर्ण पत्त्यासह व सांकेतिक क्रमांकासह व संमतीपत्रासह (संमतीपत्रावर मुख्याध्यापक / प्राचार्य व संस्था चालकाची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.) सोबत जोडलेल्या(ई) प्रपपत्रात माहिती द्यावी. | | |
| 6 | नियोजित केंद्राच्या ठिकाणी मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालय आहे काय? असल्यास त्यासाठी स्वतंत्र इमारत आहे काय? | | |
| 7 | नियोजित केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या प्राथमिक शाळांची संख्या व त्यांच्या इमारतीबाबतची माहिती. | | |
| 8 | नियोजित केंद्राच्या इमारतीत सुरक्षित बंदिस्त कंपाऊंड आहे का? असल्यास त्याचे स्वरूप कोणते आहे? कंपाऊंड नसल्यास त्याची पूर्तता करण्याबाबत संस्थेचे हमीपत्र. | | |
| 9 | नियोजित केंद्रास संलग्न होणाऱ्या शाळांचे इ.10 वी इ.12 वीचे किती वर्ग आहेत व त्यातील एकूण विद्यार्थी संख्या. | | |
| 10 | नियोजित केंद्रास संलग्न होणाऱ्या शाळा यापूर्वी कोणत्या परीक्षा केंद्रावर संलग्न होत्या. मागील वर्षी त्यांचे किती विद्यार्थी सदर परीक्षा केंद्रावर होते. सदर परीक्षा केंद्राची नावे केंद्र क्रमांकासह, केंद्राचे ना–हरकत प्रमाणपत्र व केंद्रापासून शाळेचे अंतर कि.मी. मध्ये नमूद करावे.परिशिष्ट (ई) प्रमाणे माहिती द्यावी. | | |

| अ. क्र. | केंद्रासाठी निश्चित केलेल्या अटी | शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने भरावयाची माहिती | तपासणी समितीचा अहवाल |
|---|---|---|---|
| 11 | नियोजित केंद्रास संलग्न होणाऱ्या प्रत्येक शाळेचे अंतर कि.मी. मध्ये नियोजित केंद्रापासून संलग्न शाळेच्या विद्यार्थ्यांना दळणवळणाची साधने, तसेच दळणवळण साधनांच्या वेळा नमूद कराव्यात. परिशिष्ठ(ई) प्रमाणे माहिती द्यावी. | | |
| 12 | नियोजित केंद्राच्या नजीकच्या परीक्षा केंद्राची माहिती व नियोजित केंद्रापासून त्यांचे अंतर कि.मी. मध्ये नमूद करावे.<br>केंद्र क्र. — अंतर | | |
| 13 | नियोजित केंद्राचे नजीकच्या ठिकाणी रेल्वेस्टेशन आहे का? असल्यास स्टेशनचे नाव | | |
| 14 | नियोजित केंद्राचे नजीकच्या ठिकाणी बस स्थानक आहे का? असल्यास बस स्थानकाचे नाव | | |
| 15 | रेल्वे स्थानक व बस स्थानक नसल्यास दळणवळणाची साधने व मार्ग दर्शविणारा नकाशा सोबत जोडावा. बसस्थानक असलेल्या गावाचे नाव व त्यापासून नियोजित केंद्राचे अंतर दर्शविणारा नकाशा व मार्गावरील गावांची नावे दर्शविण्यात यावी. | | |
| 16 | नियोजित केंद्राच्या ठिकाणी पोस्ट ऑफिस आहे का?नजीकच्या पोस्ट ऑफिसचे नाव,अंतर व कामाची वेळ | | |
| 17 | नियोजित केंद्राच्या माध्यमिक शाळेत /कनिष्ठ महाविद्यालयात दूरध्वनी सोय असल्यास एस.टी.डी. कोडसह दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करण्यात यावा. तसेच संस्थाचालक, सचिव, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक यांचे दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करण्यात यावेत. | | |
| 18 | नियोजित केंद्राच्या ठिकाणी संलग्न शाळेच्या विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची स्वतंत्ररित्या व्यवस्था आहे काय? असल्यास कोणत्या प्रकारची आहे?नसल्यास ती कोणत्या प्रकारे केली जाईल? याची सविस्तर माहिती स्वतंत्ररित्या देण्यात यावी. | | |
| 19 | नियोजित केंद्राच्या ठिकाणी संलग्न शाळेचे विद्यार्थी आजारी पडल्यास सरकारी रूग्णालय किंवा खाजगी रूग्णालयांच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून मोफत औषधोपचार होवू शकेल काय? नसल्यास याबाबत काय व्यवस्था केली जाईल. नजीकच्या दवाखान्याचे नाव व अंतर द्यावे. | | |

| अ. क्र. | केंद्रासाठी निश्चित केलेल्या अटी | शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाने भरावयाची माहिती | तपासणी समितीचा अहवाल |
|---|---|---|---|
| 20 | नियोजित केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना बसण्याकरिता किती वर्ग खोल्या आहेत ? प्रत्येक खोल्यांचे स्वतंत्र आकारमान द्यावे | | |
| 21 | नियोजित केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात एकूण किती बाके आहेत ? व एका वर्गात किती विद्यार्थी बसू शकतात ?<br>बाकाचे प्रकार – सिंगल<br>डबल | | |
| 22 | नियोजित केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीचा वास्तुविशारदाने तयार केलेला आराखडा सोबत जोडण्यात यावा. | | |
| 23 | मंडळाने पुरविलेल्या प्रश्नपत्रिका अपूऱ्या पडल्यास त्या उपलब्ध करुन घेण्याची व्यवस्था असणे आवश्यक असते. त्यासाठी संगणक,प्रिंटर,इंटरनेट सुविधा,फॅक्स मशीन आपल्या कार्यालयात उपलब्ध आहे काय ? फॅक्स मशीन नसल्यास नजीकचा फॅक्स क्रमांक द्यावा. | | |
| 24 | परीक्षा केंद्रावर उत्तरपत्रिका व परीक्षेसंदर्भातील इतर स्टेशनरी ठेवण्यासाठी पुरेशी व्यवस्था आहे का ? कपाटांची संख्या द्यावी. | | |
| 25 | आपल्या शिक्षण संस्थेची नियोजित परीक्षा केंद्र सुरु करण्यास संमती आहे काय ? तसा ठराव करुन त्याची छायांकित प्रत सोबत जोडण्यात यावी. | | |
| 26 | आपल्या संस्थेत जे कर्मचारी कार्यरत आहेत ते परीक्षा संचालनात कोणत्या स्तरावर काम करतील. तसेच परीक्षा कामात अडथळा वा हस्तक्षेप करणार नाहीत. कोणत्याही प्रकारचे गैर प्रकार करणार नाहीत किंवा करु देणार नाहीत. याबाबत संस्था चालकाचे हमीपत्र घेवून जोडावेत.<br>शिक्षक संख्या<br>शिक्षकेत्तर संख्या | | |
| 27 | नियोजित केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात<br>1.पिण्याच्या पाण्याची सोय कशा पध्दतीने केलेली आहे ?<br>2.स्वतंत्र स्वच्छता गृह–मुले<br>मुली<br>3.विद्युत जोडणी<br>4.जनरेटर व्यवस्था<br>इत्यादी बाबी परीक्ष काळात पुरविण्याबाबत संस्थाचालक तयार असल्याबाबत त्यांचे लेखी हमी पत्र जोडण्यात यावे. | | |

| अ. क्र. | केंद्रासाठी निश्चित केलेल्या अटी | शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाने भरावयाची माहिती | तपासणी समितीचा अहवाल |
|---|---|---|---|
| 28 | नियोजित केंद्रास परीक्षा संचलनाकामी फर्निचर कमी पडल्यास संलग्न होणाऱ्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालय विनाअट पुरविण्यास तयार असल्याबाबत व सदर फर्निचर स्वखर्चाने आणण्याबाबत आपल्या संस्थेसह सर्व संस्था चालकांची लेखी हमीपत्रे सोबत जोडावी.(प्रत्येक शाळेचे स्वतंत्र) | | |
| 29 | नियोजित केंद्राच्या ठिकाणी पोलीस चौकी उपलब्ध आहे काय ? नसल्यास नजीकच्या पोलीस चौकीचे / स्टेशनचे नाव, केंद्रापासून अंतर कि.मी.मध्ये नमूद करण्यात यावे. | | |
| 30 | नियोजित केंद्र निर्मितीची गरज का आहे ? याबाबत मुख्याध्यापक / प्राचार्य यांचा अभिप्राय देण्यात यावा. (सदर अभिप्राय स्वतंत्र देण्यात यावा) | | |
| 31 | नियोजित केंद्राचे तालुक्याचे ठिकाणापासूनचे अंतर किती ? (कि.मी.मध्ये) परीक्षेच्या कालावधीत गोपनीय कागदपत्रांची ने–आण तालुक्याच्या ठिकाणापसून सकाळी 6.00 ते दुपारी 4.00 या वेळेत करावयाची झाल्यास वाहनांची उपलब्धता आहे का ? असल्यास त्याचे स्वरुप कोणते ? एस.टी.चे वेळापत्रक देण्यात यावे. | | |
| 32 | नियोजित केंद्र प्रस्ताव प्रक्रिया शुल्क रु.1000 / – व छाननी शुल्क रक्कम रुपये 10,000 / – चा असे एकूण रु.11,000 / –भरणा करणे संदर्भात संक्षिप्त माहिती. सदर रक्कम ना परतावा असेल याची नोंद घ्यावी. अ) डी.डी.क्रमांक ब) NEFT/RTGS क) रोख | | |
| 33 | नियोजित केंद्रात संलग्न होणाऱ्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालये पूर्वी ज्या केंद्रात जात होते त्या केंद्राचे ना हरकत प्रमाणपत्र. | | |

सांकेतिक क्रमांक : ..............................................

स्थळ : ..........................................................

दिनांक: ........................................................

मुख्याध्यापक / प्राचार्य

(शाळा / कनिष्ठ महाविद्यालय शिक्का)

महत्वाची सूचना

उपरोक्त अर्जात नमूद केलेली आवश्यक ती माहिती स्वतंत्र प्रपत्रामध्ये देण्यात यावी. तसेच संस्था चालकाचे हमीपत्र / संमतीपत्र स्वतंत्र देण्यात यावे. त्यावर परिच्छेद क्रमांक नमुद करण्यात यावा. नियोजित केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व सर्व संलग्न शाळाच्या पत्रावर सांकेतिक क्रमांक व केंद्र क्रमांक ठळक अक्षरात नमूद करण्यात यावा.

## परिशिष्ट 'इ'

## नियोजित केंद्रापासून तालुक्याचे ठिकाणी जाण्यासाठी व येण्यासाठी उपलब्ध असलेल्या गाड्यांचे वेळापत्रक

| अ.क्र. | तालुक्याच्या ठिकाणाहून येणाऱ्या गाड्या | वेळ | नियोजित केंद्रापासून जाणाऱ्या गाड्या | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |

## परिशिष्ट 'इ'

## नियोजित केंद्राचा फायदा घेणाऱ्या विद्यालयातील इ. १० वी / १२ वी विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | शाळेचे नांव | शाळा क्रमांक | इ. १० वी वर्ग संख्या | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमित | पूर्नपरीक्षार्थी | एकूण |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १० | | | | | | |

## केंद्रसंचालकांचे हमीपत्र

मी श्री./श्रीमती........................................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक........................................................................................................

केंद्रसंचालक/उपकेंद्र संचालक केंद्र क्रमांक..............................................केंद्राचे नांव..............................................

..............................................................तालुका ...........................जिल्हा...........................असे लिहून

देतो की, विभागीय मंडळामार्फत परीक्षा संचालनासंदर्भात पुरविण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना पुस्तिकेतील सुचना, मंडळाकडून वेळोवेळी देण्यात आलेली परीक्षा विषयक, परिपत्रके व सभामधून दिलेल्या सुचनांचे पालन करणे व त्या अनुषंगाने परीक्षा संचलन करणेस कटीबध्द आहे.

( )

नांव व स्वाक्षरी

---

## केंद्रसंचालकांचे हमीपत्र

मी श्री./श्रीमती........................................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक........................................................................................................

केंद्रसंचालक/उपकेंद्र संचालक केंद्र क्रमांक..............................................केंद्राचे नांव..............................................

..............................................................तालुका ...........................जिल्हा...........................असे लिहून

देतो की, विभागीय मंडळामार्फत परीक्षा संचालनासंदर्भात पुरविण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना पुस्तिकेतील सुचना, मंडळाकडून वेळोवेळी देण्यात आलेली परीक्षा विषयक, परिपत्रके व संभामधून दिलेल्या सुचनांचे पालन करणे व त्या अनुषंगाने परीक्षा संचलन करणेस कटीबध्द आहे.

( )

नांव व स्वाक्षरी

# -:संमतीपत्र :-

मी प्रतिज्ञापूर्वक प्रमाणित करतो की, यापूर्वी --------------------------------------------------

ही माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा रस्त्याने------------------------ कि. मी. अंतरावरील -----------

------------------------------------------ ---------------------------- -------------------------

परीक्षा केंद्रास संलग्न होती व आता प्रस्तावित परीक्षा केंद्र शाळा -----------------------------------------

----------------------------- ही रस्त्याने -------------------कि. मी अंतरावर असून, पूर्वीपेक्षा प्रस्तावित केंद्र या शाळेस जवळचे आहे, म्हणून प्रस्तावित परीक्षा केंद्रास माझी संमती आहे. हे खरे व वस्तुस्थितीवर आधारित आहे. सदरहू माहिती चुकीची सिध्द झाल्यास मी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील, हे मला मान्य आहे.

सही -----------------------------------

नांव -----------------------------------

पद्र -----------------------------------

शाळेचे नांव--------------------------------

# नवनिर्मित केंद्रास संलग्न शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे हमीपत्र

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्र.
दिनांक : / / २०

प्रति,
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**विषय : फेब्रुवारी–मार्च २०..........माध्यमिक शालान्त/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी नविन केंद्र निर्मितीबाबत**

मार्च २०...........च्या परीक्षेपासून ........................................................................................................... या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात नवीन परीक्षा केंद्र सुरु करण्याचे संदर्भात सदर केंद्रात आमची शाळा/कनिष्ठ महाविद्यालय समाविष्ट होणार असल्याने या संदर्भात पुढीलप्रमाणे हमीपत्र देण्यात येत आहे.

## हमीपत्र (रु. १००/– च्या मुद्रांकावर)

हमीपत्र लिहून देण्यात येते की,

१) परीक्षा केंद्रावर आवश्यकता भासल्यास फर्निचर पोहोच केले जाईल.

२) परीक्षा केंद्रावर आवश्यकता भासल्यास शाळेचे कर्मचारी व शिक्षक यांची सेवा उपलब्ध करून देण्यात येईल.

३) परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार आमच्याकडून घडणार नाही.

४) परीक्षा केंद्रावर आमच्या शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयांच्या शिक्षकामार्फत/कर्मचाऱ्यामार्फत गैरप्रकार झाल्यास त्यांच्यावर मंडळ निर्देशानुसार संस्थेमार्फत कारवाई करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| छायाचित्र व स्वाक्षरी | छायाचित्र व स्वाक्षरी | छायाचित्र व स्वाक्षरी |
| मुख्याध्यापक/प्राचार्य | संस्था सचिव | संस्था अध्यक्ष |
| नाव .............................. | नाव.............................. | नाव.............................. |
| .................................... | .................................... | .................................... |
| शिक्का | शिक्का | शिक्का |

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्र.
दिनांक : / /२०

प्रति,
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

विषय : फेब्रुवारी-मार्च २०..........माध्यमिक शालान्त/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी नविन केंद्र निर्मितीबाबत

आमच्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात फेब्रुवारी/मार्च २०.........च्या परीक्षेपासून नविन परीक्षा केंद्र सुरु करण्याचे संदर्भात पुढीलप्रमाणे हमीपत्र देण्यात येत आहे.

## हमीपत्र (रु. १००/- च्या मुद्रांकावर)

हमीपत्र लिहून देण्यात येते की,

१) आमच्या परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. तसेच गैरमार्गाचा अवलंबही होणार नाही यासाठी सर्व प्रकारची दक्षता घेवू.

२) केंद्रावर प्रविष्ठ होणारे सर्व विद्यार्थी फर्निचरवर बसून परीक्षा देतील व कोणीही विद्यार्थी जमिनीवर बसून परीक्षा देणार नाही. तसेच फर्निचर अन्य ठिकाणावरुन वाहतुक करावी लागल्यास ती आमच्या स्वखर्चाने करण्यात येईल.

३) केंद्र इमारतीचे संरक्षणार्थ कंपाऊंड वॉल/तारेचे कुंपण आहे.

४) केंद्र इमारतीचे संरक्षणार्थ सध्या कंपाऊंड वॉल/अगर तारेचे कुंपण नाही ते तयार करुन घेवून त्याबाबतचा पुर्तता अहवाल दिनांक / / पर्यंत मंडळास पाठविण्यात येईल.

५) परीक्षा काळात प्रश्नपत्रिका वितरण व उत्तरपत्रिका संकलन यासाठी सर्वात जवळचे स्थळ..................................हे आहे.

६) परीक्षा केंद्र एका वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर मंजूर करण्यात आले असून काही गैरप्रकार आढळून आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता ते बंद केल्यास आमची कोणतीही तक्रार राहणार नाही.

७) परीक्षा केंद्रावर पिण्याचे पाणी, विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह याची सोय स्वखर्चाने उपलब्ध करुन देण्यात येईल. परीक्षा केंद्रावर सर्व भौतिक सुविधा परीक्षा कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येतील.

८) परीक्षा केंद्रावर परीक्षा शांततेच्या वातावरणात पार पडेल याची आम्ही हमी देतो.

९) परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार होणार नाही. गैरप्रकार झाल्यास शाळेची मान्यता काढून घेण्यास आमची संमती आहे.

१०) परीक्षा केंद्रावर शिक्षकांमार्फत/कर्मचाऱ्यामार्फत गैरप्रकार झाल्यास त्यांच्यावर मंडळ निर्देशानुसार संस्थेमार्फत कारवाई करण्यात येईल.

११) परीक्षा केंद्रावर परीक्षा काळात जनरेटरची सुविधा उपलब्ध असेल.

| | | |
|---|---|---|
| छायाचित्र व स्वाक्षरी | छायाचित्र व स्वाक्षरी | छायाचित्र व स्वाक्षरी |
| मुख्याध्यापक/प्राचार्य | संस्था सचिव | संस्था अध्यक्ष |
| नाव ................................ | नाव................................... | नाव.................................... |
| .................................. | .......................................... | ............................................ |
| शिक्का | शिक्का | शिक्का |